१२. आपल्या विद्यालयातील काही संस्मरणीय आठवणी.

१३. माजी विद्यार्थी मेळाव्यास उपस्थितीविषयी आपली अनुकूलता. होय / नाही

मेळाव्यास आपली सहकुटुंबियांसह संख्या. _____

(प्रश्नावली व्यतिरीक्त जादा माहिती द्यावयाची असल्यास स्वतंत्र कागदावर सोबत द्यावी)

माजी विद्यार्थ्यांची स्वाक्षरी.

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद"
-कर्मवीर

रयत शिक्षण संस्थेचे

जिजामाता

ज्यूनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन,

सातारा.

Email Id - jmsatara@gmail.com, satarajavscr@gmail.com
Phone no. - (02162) - 238133

माजी विद्यार्थी आवाहन पत्र

कर्मवीर आण्णांनी तत्कालिन कलेक्टर हमीद अली यांच्या पत्नी शरीफाबेगम अली यांच्या आग्रहास्तव महाराष्ट्रातील पहिल्या केवळ मुलींसाठी असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या जिजामाता ज्यूनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशनची स्थापना १२ जून १९४२ रोजी केली. अशा या विद्यालयाच्या आपण माजी विद्यार्थिनी आहात. अभिनंदन!!!

दि. १२ जून २०१६ रोजी विद्यालय ७५ व्या वर्षात पदार्पण करीत असून सन २०१६-१७ हे शैक्षणिक वर्ष अमृतमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्ताने सर्वसक्षम झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा भव्य आनंद मेळावा व सर्व माजी प्राचार्य व प्राध्यापकांचा स्नेहमेळावा रविवार दि. १८ सप्टेंबर २०१६ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता आयोजित केला आहे. त्यानिमित्ताने आपणाशी सुसंवाद साधता येईलच, त्याचबरोबर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आलेख आपणासमोर मांडणे, गतस्मृतींना उजाळा देणे, ऋणानुबंध पुन:श्च जोडणे, नवीन पिढीसमोर आपल्या आदर्शांची, गतवैभवाची मांडणी व आपल्याच सद्विचार व कृतिद्वारा विद्यालयाच्या भविष्यकालाचे नेपथ्यरचन करता येईल. आपण आपल्या बॅचवेळी आपल्याला आलेल्या आगळ्यावेगळ्या अनुभवांचे शब्दांकन लेखाच्या स्वरूपात येतांना बरोबर घेऊन यावे.

आपणाबरोबर असलेल्या जास्तीत जास्त माजी विद्यार्थिनींना देखील या मेळाव्याची कल्पना देऊन उपस्थित रहाणेविषयी कळवावे.

त्याचबरोबर सोबतची प्रश्नावली पत्र मिळताच उलट टपाली 'मा. प्राचार्या, जिजामाता अध्यापिका विद्यालय, कर्मवीर समाधी परिसर, सातारा ४१५००२'' या पत्त्यावर अथवा ९८८१४५९९९३ किंवा ९९२३७०६७८ यावWhatsup नंबरवर अथवा jmsatara@gmail.com या email वर त्वरीत पाठवावी.

आपण आपल्या I- Card व आपल्या बॅचवेळी कॉलेजमधील संस्मरणीय जुन्या ग्रुप फोटोसह मेळाव्यास आवर्जून स्वत:, सहकुटुंब, मित्र, मैत्रिणी व आप्तस्वकीयांसह उपस्थित रहावे. ही विनंती.

सौ. स्नेहा कुलकर्णी
प्राचार्या,
जिजामाता ज्यूनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा

कार्यक्रम पत्रिका

रविवार दि. १८ सप्टेंबर २०१६

१०.३० ते ११.३० नोंदणी
११.३० ते १२.०० प्रमुख अतिथी परिचय व स्वागत
१२.०० ते ०१.०० व्याख्यान
०१.०० ते ०२.०० परिचय व स्वागत
०२.०० ते ०२.३० भोजन
०२.३० ते ०३.३० ज्येष्ठ विद्यार्थ्यांचा सत्कार
०३.३० ते ०५.०० फनी गेम्स

माजी विद्यार्थी आवाहन पत्र-प्रश्नावली

१. माजी विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव : _____

२. लग्नानंतरचे नांव : _____

३. सध्याची शैक्षणिक पात्रता : _____

४. जिजामातामधील कालावधी : _____

५. पत्रव्यवहाराचा पत्ता : _____

६. जन्मदिनांक : ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

७. मोबाईल नं. : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

८. ई-मेल : _____

९. नोकरीचा पत्ता : _____

१०. पदनाम : _____

११. जिजामातामधील किमान ५ वर्गमैत्रिणींची नांवे, पत्ता, मोबाईल नं., ई-मेल आयडी.

मागे पहा